दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
● वर्ष १६ वे ● अंक २५६ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● शनिवार दि.११ डिसेंबर २०२१ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## १९ लाखाची रोकड लुटणाऱ्या आरोपींना गुन्हे शाखा कक्ष २ पनवेलने केले गजाआड

**दै.रायगड नगरी । पनवेल**

**कामोठे बस स्टॉपजवळ थांबलेल्या एका खाजगी बसमधून उतरलेल्या सोन्या चांदीच्या व्यापाऱ्याच्या डोळ्यात मिरचीची पुड टाकून त्याला धारदार शस्त्राने वापर करून त्याच्या जवळ असलेली १९ लाख रुपयाची रोकड असलेली बॅग घेवून पसार झालेल्या ६ लुटारुंना गुन्हे शाखा कक्ष २ पनवेलच्या पथकाने अवघ्या ७२ तासात गजाआड केले आहे.**



या संदर्भात व्यापारी संतोष जाधव (३८) यांनी सदर गुन्ह्याची नोंद कामोठे पोलीस ठाण्यात होताच तात्काळ अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) . महेश घुर्ये, पोलीस उप आयुक्त, गुन्हे शाखा . सुरेश मेंगडे यांच्या मार्गदर्शनाखाली कामोठे पोलीस ठाण्याचे पथक व गुन्हे शाखा २ पनवेलचे पथक यांनी घटनास्थळी भेट देवून गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेवून तपासाला सुरूवात केली. गुन्हे शाखा, कक्ष ०२ पनवेल यांच्या कडुन तपास करीत असताना, वरिष्ठ पोलीस निरीक्षक गिरीधर गोरे स.पो.नि. प्रविण फडतरे, संदिप गायकवाड, पोलिस उप निरीक्षक वैभव रोंगे, मानसिंग पाटील यांनी गुन्ह्यातील जखमी इसम, प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, घटनास्थळावरील प्राप्त सी.सी.टी.व्ही. फुटेज तसेच पो.ना. आजिनाथ फुदे, पो.शि. संजय पाटील, प्रविण भोपी यांनी केलेल्या तांत्रिक तपासाच्या आधारे अतिशय कौशल्यपुर्ण व सलग तपास करुन कोणतेही धागेदोरे नसताना गुन्ह्यात एकुण ६ आरोपींना निष्पन्न केले. सदर गुन्हयातील ०६ आरोपींना मुंबई, नवी मुंबई, ठाणे, पुणे व कर्नाटक राज्य येथे जावुन अतिशय शिताफिने ७२ तासांच्या आत गुन्हे शाखा कक्ष ०२ पनवेल यांनी अटक केली. अशा प्रकारे सुरवातीस जबरी चोरी म्हणून दाखल झालेला गुन्हा दरोडा असल्याचे निष्पन्न झाले.

गुन्हयात भादविसं कलम ३९५, ३९७, ३४१, १२०(ब) व आर्म ॲक्ट कलम ४, २५ अंतर्भाव करण्यात आला आहे. यामध्ये आरोपी अनिकेत जोमा म्हात्रे, वय २३ वर्षे, रा. ओवळेगाव, पो. पारगाव, ता. पनवेल जि. रायगड, कार्तिक सुशिल सिन्हा, वय- २४ वर्षे, धंदा- ड्रायव्हर, रा. कल्पनानगर, पाषाण लिंक रोड, बानेर पुणे, किरण विजय पवार, वय- २१ वर्षे, धंदा- नोकरी, रा. घोटगाव, पो. कोयनावेळे, पनवेल, जि. रायगड, भिमा रामराव पवार, वय- २१ वर्षे, धंदा- नोकरी, रा. घोटगाव, पो. कोयनावेळे, ता. पनवेल, जि. रायगड, मनोज गुरम्या राठोड, वय-२२ वर्षे, धंदा- मासेविक्री अशी नावे असून सदर आरोपींकडे केलेल्या चौकशीमध्ये नमुदचा गुन्हा हा अटक आरोपी व इतर ०४ पाहिजे आरोपी यांनी टी पॉइंट चिंचपाडा येथील टेकडीवर कट रचुन केलेला आहे. नमुद आरोपिंनी फिर्यादी यांचा माग काढुन त्यांच्यावर घातक शस्त्राने हल्ला करुन सदरचा गुन्हा केलेला आहे.

गुन्ह्यातील व्यापारी संतोष जाधव हे अंबेजोगाई बिड येथील सोन्याचे व्यापारी असुन अंबेजोगाई येथे प्रत्येक शनिवारी मार्केट बंद असल्याने ते शुक्रवारी रात्री सोने खरेदी करण्यासाठी अंबेजोगाई येथुन खाजगी ट्रॅव्हल्स बस ने मुंबई येथे येत असत. त्यावेळी फिर्यादी हे प्रत्येक शनिवारी कामोठे बस थांबा येथे उतरुन ते अटक आरोपी अनिकेत म्हात्रे याच्या परिचयाच्या व्यक्तिकडे फ्रेश होण्यासाठी जात असत.

त्यांनतर ते सोने खरेदी करुन पुन्हा संध्याकाळी खाजगी ट्रॅव्हल्स बसने मुळगावी परत जात असत. सदरची माहीती अटक आरोपी अनिकेत म्हात्रे याने त्याच्या इतर साथिदारांना सांगितली. त्यानुसार त्यांनी हा कट रचल्याची माहिती पोलिसांकडून देण्यात आली आहे.

## कर्जत भूमिअभिलेख कार्यालयाचे छाननी लिपिक १० हजाराची लाच घेताना ताब्यात

**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत तालुका भूमिअभिलेख कार्यालयात जमिनीची मोजणी केल्यानंतरच हद्द कायम करणारा मोजणी नकाशा देण्यात टाळाटाळ केली जात होती. त्या कामासाठी या कार्यालयातील छाननी लिपिक दत्ता जाधव हे १० हजार रूपयांची मागणी करीत होते. दरम्यान,सततच्या त्रासाला कंटाळून संबंधित शेतकऱ्याने अलिबाग येथील लाचल-ुचपत विभागाकडे तक्रार केल्यानंतर रचलेल्या सापळ्यात छाननी लिपिक १० हजाराची लाच घेताना रंगेहाथ पकडले.

कर्जत तालुक्यातील आरवंद येथील कैलाश पेरणेकर यांनी आपली सात गुंठे जमीन कर्जत भूमिअभिलेख कार्यालयाकडे मोजणी करून घेतली होती. २५ ऑक्टोबर आरवंद येथील जमिनीची मोजणी झाल्यानंतर त्या मोजणीचा नकाशा तसेच हद्द निश्चित करणारे प्रमाणपत्र देण्याचे काम या कार्यालयाचे असते. मात्र छाननी लिपिक दत्ता जाधव हे दहा हजार रुपयांची मागणी करीत होते.कार्यालयात गेल्यानंतर पेरणेकर यांच्याकडून पैसे पोहचले नाहीत तर पुढचे काम होणार नाही असे दत्ता जाधव सांगत होते. शेवटी शेतकरी पेरणेकर यांनी अलिबाग येथे जाऊन लाचलुचपत विभागाच्या उपअधीक्षक सुषमा सोनवणे यांची भेट घेऊन तक्रार नोंदविली. त्यानंतर आज १० नोव्हेंबर रोजी दुपारी कर्जत भूमिअभिलेख कार्यालयात अलिबाग लाचलुचपत विभागाने सापळा लावला.

त्या कार्यालयात जाधव यांनी शेतकरी कैलाश पेरणेकर यांच्याकडून १० हजार रुपये स्वीकारताना रंगेहात पकडले. कर्जत तालुक्यात अनेक महिन्यांनी लाचलुचपत विभागाने ही कारवाई केली असून या कारवाईचे स्वागत केले जात आहे.

## ५ टक्के निधीसाठी दिव्यांगांचा उरण पंचायत समिती कार्यालयासमोर एल्गार

**दै.रायगड नगरी । उरण**

शासनाच्या आदेशानुसार ग्राम पंचायत, पंचायत समिती तर्फे देण्यात येणारा ५ टक्के निधी मागील अनेक वर्षे थकीत ठेवला असून दिव्यांग संघटनेकडून अनेक वेळा निवेदन देवून देखील कोणतीही दखल घेण्यात आलेली नाही. ०३ सप्टेंबर २०२१ रोजी गट विकास अधिकारी यांच्या दालनात झालेल्या बैठकीत मान्य केला असून, दिव्यांग निधी त्वरित वितरित केला जाईल. परंतु त्याची कोणतीही अंमल बजावणी झालीच नाही.

जागतिक अपंग दिना दिवशी ३ डिसेंबर २०२१ रोजी ग्रामपंचायत, पंचायत समिती, उरण तहसिलदार यांना दि.१० डिसेंबर २०२१ रोजी तीव्र आंदोलन छेडण्याची नोटीस देण्यात आली होती. परंतु तरीही कोणतेही उत्तर न मिळाल्यामुळे शुक्रवार (दि. १०) रोजी पंचायत समिती उरण येथे दिव्यांग बांधवांनी मोर्चा काढला. गटविकास अधिकारी निलम गाडे यांनी लेखी स्वरूपात लिहून दिले की, चाणजे ग्रुप ग्रामपंचायती मार्फत दिव्यांग व्यक्ती करिता ५ टक्के निधी मागील अनुशेष सहित रक्कम रुपये ८ लाख ५३ हजार ६२० खर्च करण्याचा आहे .सदरची बाब शुक्रवार दि. १० डिसेंबर रोजी कार्यालया समोर चाणजे ग्रामपंचायतीचे सरपंच व ग्रामसेवक यांच्या समवेत चर्चा केली आहे. या चर्चेमध्ये दिलेल्या आश्वासनाची पूर्तता कटाक्षाने पूर्ण करण्याबाबत सरपंच व ग्रामविकास अधिकारी ग्रामपंचायत चाणजे यांना देण्यांत आल्या आहेत. .../२



## संक्षिप्त...

### सोमवारपर्यंत कामावर येणाऱ्या एसटी कर्मचाऱ्यांचे निलंबन मागे घेणार : परिवहनमंत्री



**दै.रायगड नगरी । मुंबई**

विलिनीकरणाच्या मागणीसाठी संपात सहभागी झालेल्या कर्मचाऱ्यांनी तातडीने सेवेत रूजू व्हावे. रूजू होणाऱ्या कर्मचाऱ्यांवर पूर्वलक्षीप्रभावाने कोणतीही कारवाई केली जाणार नाही. तथापि, संपकाळात ज्या कर्मचाऱ्यांवर निलंबनाची कारवाई झाली आहे, असे आवाहन करीत कर्मचारी सोमवारपर्यंत कर्तव्यावर हजर झाल्यास त्यांच्यावरील निलंबनाची कारवाई रद्द करण्यात येईल, असे परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष ॲड. अनिल परब यांनी निलंबित कर्मचाऱ्यांना मोठा दिलासा दिला आहे.

एसटी महामंडळचे राज्य सरकारमध्ये विलिनीकरण करावे, या मागणीसाठी एसटी कर्मचाऱ्यांनी बेमुदत संप पुकारला आहे. गेल्या एक महिन्यांहून अधिक काळ संप सुरु आहे. यासंदर्भात परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष, ॲड. अनिल परब यांनी राज्यभरातील आगारातील गाड्यांचा तसेच कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीचा आढावा घेतला. परिवहन मंत्री ॲड परब म्हणाले, दि. २० डिसेंबर रोजी उच्च न्यायालयात संपाबाबत सुनावणी होणार आहे. या सुनावणीदरम्यान न्यायालयाने नेमलेली समिती प्राथमिक अहवाल सादर करणे अपेक्षित आहे. विलिनीकरणासंदर्भातील अंतिम अहवाल १२ आठवड्यापर्यंत म्हणजेच सुमारे २० जानेवारी २२ पर्यंत उच्च न्यायालयाला सादर करण्यात येईल. त्यामुळे न्यायालयीन प्रक्रियेबाबत कर्मचाऱ्यांमध्ये निर्माण झालेला संभ्रम दूर करावा.

## भविष्यात कोळी बांधवासाठी अद्यावत मच्छिमार्केट उभारणार : आ.रविशेठ पाटील



**दै.रायगड नगरी । पेण**

पेण मधील कोळी बांधवासाठी भविष्यात अद्यावत असे सुसज्ज मच्छिमार्केट उभारणार असा संकल्प आमदार रविशेठ पाटील यांनी पेणमध्ये व्यक्त केला. पेणमधील कोळी बांधवासाठी मच्छिमार्केट उभारण्याच्या कामाचे भूमिपूजन भाजप आमदार रविशेठ पाटील यांच्या हस्ते व नगराध्यक्षा प्रीतम पाटील यांच्या उपस्थितीत करण्यात आले.

याप्रसंगी आमदार रविशेठ पाटील, नगराध्यक्षा प्रीतम पाटील, गटनेते अनिरुद्ध पाटील, सभापती दर्शन बाफणा, नगरसेविका शेहनाज मुजावर, नगरसेविका देवता साकोस्कर, नगरसेविका अश्विनी शहा, नगरसेवक अजय क्षिरसागर, कोळीवाडा पंचकमिटी अध्यक्ष आदींसह कोळी बांधव उपस्थित होते.

यावेळी बोलताना रविशेठ पाटील यांनी सांगितले कि, कोळी समाज अतिशय कष्टाळू असून येथील महिला वर्ग सकाळपासून मच्छीविक्री करीत असतात. अशा या कष्टकरी समाजासाठी एक सुसज्ज मार्केट बांधण्याचा आपले प्रयत्न असून .../२

## कर्जत-खोपोली मार्गावरील वाहनधारकांसाठी हाळ फाटा 'बेचव'

**दै.रायगड नगरी । खोपोली**

कर्जत – खोपोली मार्गावर हाळ फाटा येथे वारंवार होणारी वाहतूक कोंडी आता चांगलीच डोकेदुखी ठरू लागली आहे. या वाहतूक कोंडीचा वाहनधारकांसह पादचारी व स्थानिक नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. हाळ फाटा ते अंजरून गावाच्या हद्दीपर्यंत रस्त्यांचे काम अर्धवट ठेवण्यात आल्याने या परिसरात वाहतुकीचा प्रश्न जटील बनला आहे. या ठिकाणी दररोज प्रचंड वाहतूक कोंडी होवून वाहनांच्या लांबच लांब रांगा लागत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

अरूंद रस्ता, आजूबाजूला व चौकात उभी राहणारी वाहने, अवजड वाहनांची सुरू असलेली वर्दळ यामुळे हाळ फाट्यावर मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी होत असते. या वाहतूक कोडींचा विद्यार्थी, वाहन चालक व पादचाऱ्यांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. या ठिकाणी वाहतूक कोंडीत अडकल्यास नाहक वेळ वाया जात आहे. रस्त्याचे काम मार्गी लावावे, नाहीतर दुसऱ्या काही तरी उपाययोजना करावी, अशी मागणी वाहनधारकांकडून करण्यात येत आहे.

या रस्त्याचे चौपदरी व रुंदीकरण करण्यासाठी अनेक शेतकऱ्यांची जमीन एमएमआरडीसीने करण्यासाठी घेतली, परंतु शेतकऱ्यांना घेतलेल्या जागेचा मोबदला न मिळाल्याने .../२



## मांडूळ सापाची विक्री करणाऱ्या तिघांना अटक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

विना परवाना अवैधरित्या मांडूळ जातीचा साप जवळ बाळगून त्याची विक्री करण्यासाठी आलेल्या त्रिकुटाला गुन्हे शाखा कक्ष ३ च्या पथकाने पनवेल जवळील पळस्पे फाटा येथील राहूल पार्क हॉटेल समोरील रस्त्यावर सापळा रचून अटक केली आहे.

शासनाची मांडुळ जातीच्या सापाची विक्री करण्यास बंदी असतानाही विना परवाना सदर साप जवळ बाळगून त्याची विक्री करण्यासाठी काही इसम येणार असल्याची माहिती गुन्हे शाखा कक्ष ३ चे वपोनि शत्रुघ्न माळी यांना मिळताच त्यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि इर्शान खरोटे, पनवेल शहर पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक लाला लोणकर, पोलीस नाईक संजय फुलकर व त्यांच्या पथकाने सदर ठिकाणी सापळा रचून यामध्ये आरोपी अरबाज मतीन शेख (२४), शाशाअली सादीक पठाण (२२), सागर नरसिंग शिंदे (२२) यांना ताब्यात घेवून त्यांची झडती घेतली असता त्यांच्याकडे असलेल्या निळ्या व काळ्या रंगाच्या हॅण्ड बॅगमध्ये एक काळा रंगाचा मांडुळ जातीचा साप आढळून आला. तसेच ५०० रुपये किंमतीचा इलेक्ट्रॉनिक वजन काटा सुद्धा आढळून आला आहे. त्यानुसार तिघांवर भादवी कलम ४२०, ५११ सह वन्य जीव प्राणी अधिनियम १९७२ चे कलम ५१, ५२ अन्वये कारवाई करण्यात आली आहे.

## वाहनांच्या वर्दळीने बोर्ली स्थानकावर अपघाताला आमंत्रण

### रस्त्यावर झेब्रा पट्टे मारण्यात यावेत : नागरिक व प्रवासी वर्गाची मागणी

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

मुरुड जंजिरा पर्यटनात साळाव-मुरुड रस्त्यावर सततच्या वाढत्या वाहनांच्या वर्दळीने बोर्ली स्थानकावर अपघाताची शक्यता लक्षात घेऊन या रस्त्यावर झेब्रा पट्टे मारण्यात यावेत. अशी मागणी वाहनचालक व नागरिकांतून जोर धरीत आहे.

कोरोना रोगाच्या पार्श्वभूमीवर लॉकडाऊन नंतर येथील जनजीवन व पर्यटन व्यवसाय पुर्वपदावर येत असताना साळाव-मुरुड रस्त्यावर मुरुड जंजिरा पर्यटनात वाहनांची वाढती वर्दळ दिसून येत असून शनिवार रविवार व सुटीच्या दिवशी वाहनांच्या रांगा लागलेल्या असतात.वेळप्रसंगी ट्रॅफिक जॅम ला सामोरे जावे लागते.साळाव-मुरुड रस्त्यावर बोर्ली स्टँडनजीक एक रस्ता सुरई गावाकडे तर दुसरा बोर्ली गावात जातो.याठिकाणी वेळप्रसंगी अप-घाताची शक्यता लक्षात घेऊन गतीरोधक अथवा झेब्रा पट्टे मारणे अत्यंत गरजेचे आहे.



या रस्त्यावरील वाढत्या वाहनांच्या वर्दळीने वेळ प्रसंगी अपघाताची शक्यता लक्षात घेऊन सार्वजनिक बांधकाम खात्याने दखल घेऊन याठिकाणी सुरक्षेच्या दृष्टिकोनातून याठिकाणी झेब्रा पट्टे मारण्यात यावेत. अशी मागणी वाहनचालक व स्थानिक नागरिकांतून जोर धरीत आहे.

## सार्वजनिक बांधकाम विभागाच्या रस्त्यावर उभी राहते संरक्षण भिंत

**दै.रायगड नगरी । उरण**

चिरनेर – कोप्रोली या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या रस्त्यावर सध्या संरक्षण भिंतीचे बांधकाम सुरू आहे. सदर संरक्षण भिंत ही रस्त्याच्या वळ-णावरच उभी राहत असल्याने प्रवाशी नागरीकांच्या वाहनांना रात्री अपरात्री अपघाताला सामोरे जावे लागणार आहे. तरी सदर संरक्षण भिंत हटविण्यात यावी अशी मागणी प्रवाशी नागरीक व्यक्त करत आहेत.

महाराष्ट्र राज्यात महाविकास आघाडीचे सरकार सत्तेवर आल्या पासून उरण तालुक्यातील रहिवाशांच्या रहदारीच्या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात यार्ड मालकांनी शासकीय नियमांचे उल्लंघन करून संरक्षण भिंतचे बांधकाम करण्याचा संकल्प हाती घेतला आहे. त्याच धर्तीवर चिरनेर – कोप्रोली या नागरिकांच्या रहदारीच्या .../२

# कर्जतमध्ये राष्ट्रवादी परिवार संवाद कार्यकर्ता शिबीर संपन्न



**दै.रायगड नगरी । माथेरान**

आज कर्जत मध्ये जिल्हाध्यक्ष श्री सुरेशभाऊ लाड यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रवादी कार्यकर्ता संवाद शिबीर आयोजित करण्यात आले होते ह्यावेळी बोलताना त्यांनी तालुक्यातील सर्व कार्यकर्त्यांना पक्ष मजबूत करण्यासाठी प्रयत्न करताना आगामी निवडणुकीसाठी स्वबळावर कामास लागण्याचे आव्हान केले.

येत्या काही महिन्यांमध्ये रायगड जिल्ह्यामध्ये निवडणुकीचे वारे वाहू लागणार आहे वरिष्ठ पातळीवर जरी महाविकास आघाडी असली तर कर्जत तालुक्यात मात्र आघाडीमध्ये बिघाडी झालेली आहे आघाडी धर्म पळत नसल्याची बोंब नेहमीच जात आहे राष्ट्रवादी जिल्हाध्यक्ष सुरेश लाड व आमदार महेंद्र थोरवे यान ह्यामध्ये सध्या सुरू असलेल्या शाब्दिक युद्धा मुळे आगामी निवडणुकीमध्ये तालुक्यात राष्ट्रवादी कोणती भूमिका घेणार ह्याकडे आजच्या मेळाव्यात सर्वांचे लक्ष लागले होते पण त्यांनी सर्व कार्यकर्त्यांना स्वबळावर निवडणुकीस सामोरे जाण्याचे आव्हाहन केले पण स्थानिक पातळीवर कार्यकर्त्यांशी चर्चा करून पुढील दिशा ठरविता येईल असे ही सूचित केले स्थानिक आमदार आघाडी धर्म पाळत नसून शासकीय कार्यक्रमात राष्ट्रवादी नेत्यांना सातत्याने दूर ठेवले जात असून सुडाचे राजकारण होत असेल तर राष्ट्रवादीही लाचार नसून स्वबळावर निवडणूक लढवून जशास तसे उत्तर देऊ असे ही त्यांनी ह्यावेळी सांगितले

ह्यावेळी माथेरान राष्ट्रवादीच्या पदाधिकाऱ्यांना नियुक्ती पत्र देण्यात आले त्यामध्ये येथील शहराध्यक्ष अजय सावंत यांना बढती देऊन रायगड जिल्हा सरचिटणीस पदी निवड करण्यात आली तर श्री राजेश दळवी यांची शहराध्यक्ष तर सौ स्वाती कुमार यांची माथेरान शहर महिला अध्यक्ष पदी निवड करण्यात आली तसेच केतन चव्हाण यांची कर्जत तालूका युवक उपाध्यक्ष पदी निवड करण्यात आली ह्यावेळी व्यासपीठावर सुरेशभाऊ लाड, सुरेश टोकरे,तानाजी चव्हाण, एकनाथ धुळे,भगवान चंचे,शरद लाड,अजय सावंत सागर शेळके,रंजना देसले, रजनी गायकवाड,वर्षा रोड्रिंक्स आदी मान्यवर उपस्थित होते

---

### प्रवासी संघाच्या प्रयत्नाला यश

# पनवेल रेले स्थानक (प) ते साईनगर प्रवासी बस फेऱ्यांत वाढ

**दै.रायगड नगरी । पनवेल**

एन.एम.एम.टी.च्या प्रवासी बस सेवा पनवेल(प) रेल्वे स्थानक ते साईनगर पर्यंत प्रवासी संघाच्या माध्यमाद्वारे या मार्गावर धावत आहेत. या विभागामधील राहणाऱ्या स्थानिक रहीवाशांकडून सतत या विभागावर पनवेल रेल्वे स्थानकावरून रात्री १०:०० पर्यंत बस चालवाव्यात अशी वारंवार मागणी लेखी निवेदनाद्वारे येत होती. कोरोना-१९ च्या सावटामुळे प्रशासनाकडून निर्णय घेतला जात नव्हता. प्रवासी संघाच्या कार्यकारीणीशी चर्चा चालू होती.

महाराष्ट्र शासनाच्या नियमावलीचे प्रशासन व प्रवासी बांधव पालन करीत असल्यामुळे, त्या प्रमाणे उपनगरीय रेल सेवा पूर्ण क्षमतेने चालू झाल्याने चाकरमानी, शासकीय-निमशासकीय, महाविद्यालयीन विद्यार्थी, व्यापारी बांधव ई.प्रवासी बांधवांची गरज लक्षात घेऊन सद्यस्थितीत पनवेल रेल्वे स्थानक ते साईनगर पर्यंत शेवटची बस संध्याकाळी ०७:०० वा.पर्यंतच होती. त्यानंतर साईनगर येथे जाण्यासाठी रीक्षा/टॅक्सी शिवाय पर्याय उपलब्ध नव्हता. त्यामुळे आर्थिक, शारिरीक, मानसिक त्रास सहन करून चाकरमानी प्रवासी बांधवांना आपले घर गाठावेच लागत होते.

प्रवासी संघाच्या माध्यमाद्वारे एनएमएमटी परिवहन वाहतूक प्रशासनाला प्रवाशांची भूमिका व्यवस्थित मुद्दे पटवून दिल्यामुळे प्रशासनाने प्रवासी बस फेऱ्यांमध्ये सोमवार दि.१३/१२/२०२१ पासून वाढ करण्याचे ठरवलेले आहे, असे आश्वासन प्रवासी संघाला वेळापत्रकासहीत देण्यांत आलेले आहे. त्यामुळे प्रवासी बांधव सुखावले आहेत.

प्रवासी संघाच्या कार्यकारीणीचे व एनएमएमटी प्रशासनाचे हार्दीक आभार मानले आहेत. प्रवासी संघ, पनवेल या सामाजिक संस्थेचे कार्यवाह व उपनगरीय रेल्वे सल्लागार समिती सदस्य श्रीकांत बापट व सह कार्यवाह निलेश जोशी यांनी शिंदे साहेब(परि) व त्यांचे सहकारी यांचे आभार मानले आहेत, असे आमच्या वार्ताहारांना सांगितले आहे. प्रवासी संघाचे अध्यक्ष डॉ.भक्तिकुमार दवे यांनी सर्व प्रवासी बांधवांना शासनाच्या नियमावलीप्रमाणे मास्क व सॅनिटायझर लावून प्रवास करावा, असे सांगितले आहे.

# तळोजा घोट गाव येथील हत्या प्रकरणातील एक आरोपी अटकेत

**दै.रायगड नगरी । पनवेल**

वडिलोपार्जित जमिनीच्या हक्कावरुन तळोजा येथील घोट गावातील निवृत्ती पाटील (५०) यांच्यावर कोयत्याने हल्ला करुन फरार झालेल्या तिघा बाप लेकापैकी मनोज बाळाराम पाटील (२४) याला तळोजा पोलिसांनी अटक केली आहे. मात्र बाळाराम पाटील व त्याचा दुसरा मुलगा नितीन पाटील हे दोघे अद्याप फरार असून पोलिसांकडून त्यांचा शोध घेण्यात येत आहे.

तळोजा येथील घोटगावात रहाणारे मृत निवृत्ती पाटील व त्याचा मोठा भाऊ बाळाराम पाटील व त्यांची बहिण सुनंदा कोळेकर या तिघा भावंडांमध्ये गेल्या अनेक वर्षापासून वडिलोपर्जित जागेच्या हक्कावरुन वाद सुरु होते. तसेच त्यांच्यामध्ये यापुर्वी देखील भांडण झाले होते. गत सोमवारी सायंकाळी सुनंदा कोळेकर, निवृत्ती पाटील व त्यांचा मुलगा निरंजन पाटील हे तिघेही घोटगाव पिंपळपाडा येथील चाळीसाठी बोअरवेलच्या पाईप लाईनचे काम करत असताना त्याठिकाणी कोयता घेऊन गेलेल्या बाळाराम पाटील मनोज पाटील आणि नितीन पाटील या तिघांनी त्यांना बोअरवेलच्या पाईपलाईनचे काम करण्यास विरोध केला. यावरून त्यांच्यात वादावादी होऊन भांडण झाले.या भांडणामध्ये बाळाराम पाटील याने लहान भाऊ निवृत्तीच्या छातीवर बसून त्याला मारहाण केली. तर त्याचा मुलगा नितीन याने नृत्तीचे हात पकडल्यानंतर मनोजने निवृत्तीच्या डोक्यावर व गळ्यावर कोयत्याने तीन चार वार करुन निवृत्ती पाटील यांची हत्या केली होती. या हत्येनंतर तिघा बाप लेकांनी त्याठिकाणावरुन पलायन केल्यानंतर तळोजा पोलिसांनी तिघा बापलेकाविरोधात हत्येचा गुन्हा दाखल केला. तसेच त्यांचा शोध घेण्यासाठी ४ पथक वेगवेगळ्या ठिकाणी रवाना केले होते. त्यानंतर पोलिसांनी तांत्रिक तपासाद्वारे आरोपी मनोज पाटील याची माहिती मिळवून त्याला अटक केली आहे. मात्र बाळाराम पाटील व त्याचा दुसरा मुलगा नितीन पाटील हे दोघे अद्याप फरार असुन त्यांचा शोध सुरु असल्याचे पोलिसांनी सांगितले.

# बोर्ली ग्रामपंचायतीत नेत्र चिकित्सा व आरोग्य तपासणी शिबिर

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

मुरुड तालुक्यातील बोर्ली ग्रामपंचायत व मुंबई -खार(पश्चिम) येथील श्री रामकृष्ण मठ व मिशन हॉस्पिटल, अलिबाग येथील श्री रामकृष्ण विवेकानंद सेवा समिती यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार दि.१२ डिसेंबर २०२१ रोजी सकाळी १०.०० वा.ते दुपारी १२.३० वा.ग्रामपंचायत कार्यालयात मोफत नेत्र चिकित्सा व आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले आहे.

---

राव साहेब

प्रो.जमा ६-२५

अर्जदाराचे वकील
अ‍ॅड.तुषार एल. सोंडकर

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर सो यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.१६९५/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.१२/०१/२०२२

गुरप्रितसिंह झालमन सिंह देओल
वय : ३१ वर्षे, धंदा :
रा.बी.४०२, निळकंठ मॅजिस्टीक,
प्लॉट नं.०५, सेक्टर १७, पोलीस हेडकॉटस जवळ,
कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

१) हरविंद कौर भंगू
वय : ४१ वर्षे, धंदा :
रा.फ्लॅट नं.५०२, श्री आशापुरा रेसिडेन्सी, सेक्टर ७,
प्लॉट नं.ए/५/१, खांदा कॉलनी, ता.पनवेल, जि.रायगड
२) कुलविंदर कौर कुशलदिप सिंग चाहल
वय : ३५ वर्षे, धंदा :
रा.५०४, भक्ती सी.एच.एस., प्लॉट नं.१६,
सेक्टर २५, कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाला

ज्याअर्थी गुरप्रितसिंह झालमन सिंह देओल वय : ३१ वर्षे, धंदा : रा.बी.४०२, निळकंठ मॅजेस्टीक, प्लॉट नं.०५, सेक्टर १७, पोलीस हेडकॉटस जवळ, कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड यांनी या मे.कोर्टात कै.गुरदीप कौर झालमन सिंह देओल यांचा प्रोबेट / वारस दाखला मिळण्याकरिता अर्ज केला आहे. कै.गुरदीप कौर झालमन सिंह देओल ह्या दि.०३/०८/२०२१ रोजी रा.५०२, श्री आशापुरा रेसिडेन्सी, प्लॉट नं.५/१, सेक्टर ७, खांदा कॉलनी, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड येथे मृत्यू पावल्या आहेत. त्यांच्या मृत्यूपश्चात त्यांच्या नावे असलेली मिळकत खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**

**फ्लॅट नं.४०२, बी विंग, चौथा मजला, प्लॉट नं.०५, निळकंठ मॅजेस्टीक, सेक्टर १७, कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड क्षेत्र ५६.४१ चौ.मी. कारपेट एरिया + १०.१३ चौ.मी. टेरेस एरिया अधिक स्टील कार पार्कींग एरिया जी-३८ (क्षेत्र २२८ चौ.फूट)**

कै.गुरदीप कौर झालमन सिंह देओल यांचे मृत्यूपश्चात त्यांस अर्जदार हे वारस आहेत. सदर वारसांव्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सबब, अर्जदार यांनी सदरचा वारस दाखला मिळण्यासाठी अर्ज करीत आहे. सदर वारसांव्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सबब, सदरचा वारस दाखला अर्जदार यांस देण्यासंबंधी कोणाही इसमाच्या कोणत्याही हरकती असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास कोणत्याही हरकती नाहीत असे समजून अर्जदार यांस वारस दाखला देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज तारीख २९/११/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

मा.गोडसे साहेब कोर्ट

अर्जदारांचे वकील अ‍ॅड.एकनाथ जी. खुटले

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.४ थे सहदिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.१७४१/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.२०/०१/२०२२

१) श्री.गजानन चाहू पाटील, वय : ६९ वर्षे
रा.तरघर, पो.उलवा, ता.पनवेल, जि.रायगड
२) श्री.एकनाथ चाहू पाटील, वय : ४७ वर्षे
रा.पारगांव, ता.पनवेल, जि.रायगड
३) देवकूबाई मारुती पावशे, वय : ६८ वर्षे
रा.जय हनुमान जिमजवळ, शिळगाव,
ता.कल्याण, जि.ठाणे ४२१२०४
४) शकुंतला लक्ष्मण घरत, वय : ५७ वर्षे
रा.कोपर, पो.गव्हाण, ता.पनवेल, जि.रायगड
५) रंजना परशुराम केदारी, वय : ५९ वर्षे
रा.पारगांव, ता.पनवेल, जि.रायगड
६) कल्पना उर्फ प्रतिज्ञा अनंत शिवगण
वय : ५२ वर्षे, रा.गणेश चाळ कमिटी,
आकुर्ली रोड, कांदिवली (पूर्व), मुंबई ४००१०१ — अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, कै.धर्मुबाई चाहू पाटील ह्या दि.१३/०८/२०२१ रोजी मौजे : पारगांव, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झाल्या आहेत. त्यांचे खालील वर्णनाचे मिळकतींबाबत वारसदाखला मिळणेकरिता अर्जदार यांनी अर्ज केलेला आहे.

**जमिनीचे वर्णन**

| अनु क्र. | युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) |
|---|---|---|---|---|
| १ | पारगांव डुंगी-९२ | ३७ | ३ | ०-१२-८ |
| २ | पारगांव डुंगी-४४ | ९ | ४ | ०-१९-६ |
| ३ | पारगांव डुंगी-४५ | ९ | ३ | ०-१८-५ |
| ४ | पारगांव डुंगी-१२२ | ३७ | ४ | ०-१२-८ |
| ५ | | ३७ | १८ | ०-०२-० |
| ६ | पारगांव-२४ | ७२ | ४ | ०-४४-० |
| ७ | | ७३ | ३ अ | ०-२८-० |

सदर मिळकती महाराष्ट्र शासनाने नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ व त्या अनुषंगिक कामांकरिता संपादीत केल्या असून, सदर मिळकतींसंदर्भात खालील वर्णनाचे भूखंड वाटप झाले आहेत.

**भूखंडाचे वर्णन**

| नोड | भूखंड क्र. | सेक्टर क्र. | क्षेत्र चौ.मीटर |
|---|---|---|---|
| पुष्पक-दापोली | १०२ | ३ | २१० |
| पुष्पक-दापोली | ३७ | ३ | १७५० |
| पुष्पक-दापोली | १८८ | ३ | २४० |

अर्जदार हे कै.धर्मुबाई चाहू पाटील यांचे कायदेशीर वारसदार आहेत. त्यांच्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकत घ्यावयाची असल्यास, त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून अगर त्यांच्या वकीलांमार्फत त्यांच्या हरकती सादर कराव्यात. विहित मुदतीमध्ये हरकत सादर न केल्यास कोर्ट ना.कोर्ट योग्य त्या पुराव्यानिशी वरील अर्जदार यांस वारस दाखला प्रदान करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत.

आज दि.१०/१२/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

मा.गोडसे साहेब कोर्ट

अर्जदारांचे वकील अ‍ॅड.एकनाथ जी. खुटले

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.२ रे सहदिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.१८०८/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.१९/०१/२०२२

१) श्रीमती.सुशिला बाबुराव पाटील, वय : ६० वर्षे
२) श्री.रवी बाबुराव पाटील, वय : ४३ वर्षे
३) सौ.रेश्मा निवृत्ती पाटील, वय : ४१ वर्षे
रा.जे-२०५, हरी ओम पार्क, बी कॅबीन रोड,
भवानी चौक, अंबरनाथ (पुर्व), जि.ठाणे
४) श्री.राज बाबुराव पाटील, वय : ३८ वर्षे
क्र.१, २ व ४ रा.फ्लॅट नं.२, आनंद अपार्टमेंट,
हिंदुस्तान बेकरीचे बाजूला, चिंचवड गांव,
तानाजी नगर, पुणे ४११०३३ — अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, कै.बाबुराव लहू पाटील हे दि.२१/०४/२०२१ रोजी ब्रह्मचैतन्य सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल प्रा.लि. चिंचवड, ता. व जि. पुणे येथे मयत झाले आहेत. त्यांचे खालील वर्णनाचे मिळकतींबाबत वारसदाखला मिळणेकरिता अर्जदार यांनी अर्ज केलेला आहे.

**जमिनीचे वर्णन**

| युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) |
|---|---|---|---|
| कोपर-३० | ५३ | १३ | ०-२१-० |
| | ९७ | १३ | ०-३७-५ |
| कोपर-३० | ३८ | ९ | ०-०३-० |
| | ३१ | ५ | ०-०९-६ |
| | १५ | १ | ०-४४-३ |
| कोपर-३४ | ५९ | ११ | ०-३२-० |

अर्जदार हे कै.बाबुराव लहू पाटील यांचे कायदेशीर वारसदार आहेत. त्यांच्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकत घ्यावयाची असल्यास, त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून अगर त्यांच्या वकीलांमार्फत त्यांच्या हरकती सादर कराव्यात. विहित मुदतीमध्ये हरकत सादर न केल्यास कोर्ट ना.कोर्ट योग्य त्या पुराव्यानिशी वरील अर्जदार यांस वारस दाखला प्रदान करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत.

आज दि.१०/१२/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

मा.सोनावणे साहेब यांचे कोर्ट

अर्जदारतर्फे वकील
अ‍ॅड.प्रितम शा. वासकर

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर साहेब यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.१८५४/२०२१
ने.ता.२१/०१/२०२२

कै.आत्माराम कोळ्या उर्फ कोल्ह्या तोडेकर (मयत) तर्फे वारस
१) श्रीमती.नामुबाई आत्माराम तोडेकर
वय : वर्षे, धंदा : गृहिणी
२) श्री.अभिमन्यू आत्माराम तोडेकर
वय : वर्षे, धंदा : शेती
३) श्री.प्रकाश आत्माराम तोडेकर
वय : वर्षे, धंदा : शेती
वरील सर्व रा.कोपरा गाव, खारघर, ता.पनवेल, जि.रायगड
४) शोभा आत्माराम तोडेकर (पुर्वाश्रमीची)
सौ.शोभा लालचंद घरत
वय : वर्षे, धंदा : गृहिणी
रा.वरचे ओवळे, ता.पनवेल, जि.रायगड
५) संगीता आत्माराम तोडेकर (पुर्वाश्रमीची)
सौ.संगीता नरेश निघुकर
वय : वर्षे, धंदा : गृहिणी
रा.घोट, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

तमाम जनतेस ह्या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, कै. आत्माराम कोळ्या उर्फ कोल्ह्या तोडेकर हे दि.११/२/२०२० रोजी मौजे : कोपरा, पो.खारघर, ता.पनवेल येथे मयत झाले असून नामुबाई आत्माराम तोडेकर... वगैरे हे त्यांच्या खाली वर्णन केलेल्या मिळकतीचे मिळकतीस कायदेशीर वारसदार आहेत.

कै.आत्माराम कोळ्या उर्फ कोल्ह्या तोडेकर यांचे नावे खालीलप्रमाणे मिळकती आहेत.

**अ) मौजे : खारघर, प्लॉट नं.३७+३८, सेक्टर १९, नवी मुंबई**

| इमारतीचे नाव | सदनिका क्रमांक | मजला | क्षेत्र चौ.मी. (कारपेट) |
|---|---|---|---|
| दि लेजेंट | ३०१ | ३ रा मजला | ७५.११२ चौ.मी. कारपेट |
| | ३०२ | ३ रा मजला | ७५.११२ चौ.मी. कारपेट |

**ब) मौजे : खारघर, कोपरा येथील खालील वर्णनाची घर मिळकत आहे.**

| रस्त्याचे नाव | सिटी सर्व्हे नं. | मालमत्ता क्र. | क्षेत्र चौ.फूट |
|---|---|---|---|
| कोपरा | १० | २२४ अ | ७८९ चौ.फूट |

क) वरील मिळकती सोबत खालील वर्णनाची संपादीत जमीन मिळकती आहेत. त्याचे वर्णन खालीलप्रमाणे

**मौजे : खारघर, ता.पनवेल, जि.रायगड**

| गाव/ अवॉर्ड युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. |
|---|---|---|---|
| खारघर १८२ | १३१ | १० | ०-१३-० |
| | १३० | ६ | ०-०७-० |
| | १४१ | १४ | ०-००-८ |
| खारघर १८३ | ३१३ | १ | ०-४४-० |
| खारघर ५६ अ | १६२ अ | २ | ०-०४-० |
| | | पो.ख. | ०-०१-० |
| खारघर ५४ | १५२ | १४ | ०-०७-६ |
| | १५१ | ५ | ०-१७-४ |
| | १५० | ५ | ०-२७-८ |
| | १४९ | १ ब | ०-२१-० |
| | ८२ अ | २ | ०-४७-० |
| | १२३ | ७ | ०-०२-० |
| खारघर ५४/२३७ | २६ | ६ | ०-४२-० |
| | ११६ | ९ | ०-०२-० |
| | ११६ | १५ | ०-०७-० |
| | १३० | २ | ०-१४-० |
| | १३१ | ४ | ०-२९-० |
| | ३२० | १० | ०-०७-० |
| खारघर १८ बी | १६१/अ | ३ | ०-२३-४ |

श्री.नामुबाई आत्माराम तोडेकर... वगैरे हे कै.आत्माराम कोळ्या उर्फ कोल्ह्या तोडेकर यांचे कायदेशीर वारसदार आहेत. ह्या हक्काबद्दल कोणीही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत घ्यावी. मे.कोर्टात प्रत्यक्ष अथवा वकीलामार्फ हजर होवून हरकती घ्याव्यात. जर ह्या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती न आल्यास हे मे.कोर्ट श्री.नामुबाई आत्माराम तोडेकर... वगैरे ह्यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची कार्यवाही करेल व ते जर कै.आत्माराम कोळ्या उर्फ कोल्ह्या तोडेकर यांचे वारसदार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल.

आज दि.१०/१२/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

मा.श्री.मुजावर साहेब

अर्जदारांतर्फे वकील
सौ.सुप्रिया रुपेश मोरे

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर), पनवेल यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.१६७२/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.०३/०१/२०२२

मयत कै.ताराबाई राघो गोवारी मयतचे वारस
१) मयत कै.कृष्णा राघो गोवारी
२) मयत कै.गणा उर्फ गणेश राघो गोवारी
३) श्रीमती.शांताबाई हरिश्चंद्र भगत
वय : ७३ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.मु.घर नं.१२९/५, उसर्ली खुर्द, शिवकर रोड,
दत्त मंदिराजवळ, ता.पनवेल, जि.रायगड
१/१) मयत कै.कृष्णा राघो गोवारीचे वारस
१/१.१) श्रीमती.रामीबाई कृष्णा गोवारी
वय : ६३ वर्षे, धंदा : गृहिणी
१/१.२) श्री.विशाल कृष्णा गोवारी
वय : ३२ वर्षे, धंदा : नोरकी
वरील १/१ व १/२ दोघे रा.मु.कामोठे,
कळंबोली नोड, ता.पनवेल, जि.रायगड
१/१.३) सौ.ज्योत्सना सुरेश शिंदे
पुर्वाश्रमीची ज्योत्सना कृष्णा गोवारी
वय : ३८ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.मु.आनंदनगर, पो.कासू, ता.पेण, जि.रायगड
१/१.४) सौ.रेश्मा विकास भगत
पुर्वाश्रमीची रेश्मा कृष्णा गोवारी
वय : ३६ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.मु.उसर्ली खुर्द, शिवकर रोड, ता.पनवेल, जि.रायगड
१/१.५) सौ.सुषमा किरण केणी
पुर्वाश्रमीची सुषमा कृष्णा गोवारी
वय : ३३ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.मु.मदलापाडा, चिंचपाडा, ता.पनवेल, जि.रायगड
१/१.६) सौ.करिश्मा अनिल केणी
पुर्वाश्रमीची करिश्मा कृष्णा गोवारी
वय : ३० वर्षे, धंदा : गृहिणी
रा.मु.दिघोडपाडा चिंचपाडा, ता.पनवेल, जि.रायगड
१/२) मयत कै.गणा उर्फ गणेश राघो गोवारीचे वारस
२/१.१) श्रीमती.छाया गणेश गोवारी
वय : ५४ वर्षे, धंदा : गृहिणी
१/२.२) श्री.चेतन गणेश गोवारी
वय : ३२ वर्षे, धंदा : नोकरी
वरील २/१ व २/२ दोघे राहणार
मु.कामोठे, कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड
१/२.३) श्री.अमोल गणेश गोवारी
वय : ३१ वर्षे, धंदा : नोकरी
रा.मु.पो.भिंगार, पी डब्ल्यू डी ऑफिस जवळ
ता.पनवेल, जि.रायगड
१/२.४) सौ.पुनम भगवान भगत
पुर्वाश्रमीची पुनम गणेश गोवारी
वय : ३३ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.मु.नौपाडा, पो.कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, ज्याअर्थी मयत कै.ताराबाई राघो गोवारी राहणार : मौजे कामोठे, ता.पनवेल माहे १०/०२/२०१६ रोजी किंवा त्या सुमारास रोजी मौजे : कामोठे, ता.पनवेल येथे राहत्या घरी मरण पावली आहे. मयत कै.ताराबाई राघो गोवाररी यांचे एक बहिण व दोन भाऊ कै.कृष्णा राघो गोवारी हे दि.१०/०९/१९९२ रोजी मौजे : कामोठे, ता.पनवेल येथे राहत्या घरी मयत पावले आहेत. तसेच दुसरा भाऊ कै.मयत गणा उर्फ गणेश राघो गोवारी हे दि.१७/०८/२०१४ रोजी मौजे : कामोठे, ता.पनवेल येथे राहत्या घरी मरण पावले असून यांच्या सामाईक मालकीच्या खालीलप्रमाणे वर्णनाच्या मिळकती महाराष्ट्र शासनातर्फे सिडको लिमिटेड यांनी दि.३/२/१९७० रोजीचे नोटीफिकेशनद्वारे ''नवी मुंबई'' प्रकल्पाकरिता संपादीत केल्या आहेत.

**संपादीत मिळकतीचे वर्णन**
**मौजे : कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड येथील**

| अ.क्र. | युनिट केस क्र. | सर्वे क्र. | हिस्सा क्र. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार |
|---|---|---|---|---|---|
| १ | कामोठे २९६ | २०४ | ६ | ०-१०-० | १.८७ |
| २ | | ३५८ | १ C | ०-०५-० | ०.५३ |
| ३ | | ३६२ | ४+५/C | ०-१५-९ | १.८१ |
| | | | एकूण | ०-३०-१२ | ४.२१ |

**संपादीत मिळकतीचे वर्णन**
**मौजे : कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड येथील**
**युनिट केस नं.४१६/२३**

| अ.क्र. | युनिट केस क्र. | सर्वे क्र. | हिस्सा क्र. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार |
|---|---|---|---|---|---|
| १ | कामोठे ४१६/२३ | ३५० | ६ | ०-४९-१ | १४२.८० |
| | | | एकूण | १-४९-१ | २२.३० |

**संपादीत मिळकतीचे वर्णन**
**मौजे : कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड येथील**

| अ.क्र. | युनिट केस क्र. | सर्वे क्र. | हिस्सा क्र. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार |
|---|---|---|---|---|---|
| १ | कामोठे ८३ | ९ | ६ | ०-१२-१ | १.८१ |
| २ | | ९ | ७ | ०-१०-६ | १.५६ |
| ३ | | २०३ | ११ | ०-१९-२ | २.४५ |
| ४ | | २०५ | २ | ०-०२-५ | ०.२८ |
| ५ | | २०६ | २ | ०-०६-६ | १.०६ |
| ६ | | २०७ | १ | ०-०६-६ | १.८० |
| ७ | | २०७ | ८ | ०-०२-० | ०.२८ |
| ८ | | २०७ | १० | ०-०३-५ | ०.४४ |
| ९ | | ३५१ | ६ | ०-२०-२ | ३.१२ |
| १० | | ३५२ | ९ | ०-१९-७ | २.८१ |
| ११ | | ३५४ | ३ A ६ A | ०-३३-४ | ५.९ |
| १२ | | ३५८ | १ A | ०-०६-१ | ०.७५ |
| | | | एकूण | १-४२-५ | २२.३० |

सदर संपादीत मिळकत साडेबारा टक्के सदर अर्जदारांचे नावे होण्याकरिता त्यांनी मयत कै.ताराबाई राघो गोवारी यांचे कायदेशी वारस असल्याबाबत वारस दाखला मिळण्याकरिता मे.कोर्टात अर्ज केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जदार यांस त्यांचे मागणीप्रमाणे वारस दाखला देणेस कुणाचीही हरकत असल्यास अशा इसमांनी त्यांच्या लेखी हरकती जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत या मे.कोर्टात सादर कराव्यात. विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास या अर्जदारांस त्यांचे विनंतीप्रमाणे वारस दाखला दिला जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आज दि.३ माहे १२ सन २०२१ रोजी माझ्या सहीने व मे.कोर्टाचे शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

# संक्षिप्त...

## २ जानेवारी रोजी पनवेलमध्ये वीरशैव लिंगायत समाजाचा वधु-वर मेळावा

**दै.रायगड नगरी । उरण**

दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी महाराष्ट्र वीरशैव सभा रायगड जिल्हयाच्या वतीने वीरशैव लिंगायत समाजातील इच्छुक वधुवरांसाठी रविवार दि २ जानेवारी २०२२ रोजी कर्नाटक संघ हॉल, शांती निकेतन शाळेजवळ, सेक्टर २, शबरी हॉटेल समोर, न्यू पनवेल येथे वधुवर मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

वीरशैव लिंगायत समाजातील सर्व जाती पोटजातीतील तसेच जंगम समाजातील बंधु भगिनींणी आपल्या उपवर मुला/मुलींसोबत हजर रहावे. कार्यक्रमाची नोंदणी ११ ते १ या वेळेत मेळाव्याच्या ठिकाणीच होईल. व लगेचच दुपारी २ वाजता मेळावा सुरु होईल. यासाठी कोणतेही प्रवेश फि नाही. अधिक माहितीसाठी अध्यक्ष महेंद्र बोडके-९८२२३४६८५२,नितिन वाणी-सेक्रेटरी ९३२५२५५६११,मंगलाताई बिराजदार-९९२०१५६१४४,रेखाताई कोरे-९९२३३८६६४२ यांच्याशी संपर्क साधावे असे आवाहन अध्यक्ष महेंद्र बोडके यांनी केले आहे.

## सोमजाई माता क्रीडा मंडळ ट्रस्ट खरसई तर्फे कबड्डी व क्रिकेट स्पर्धांचे भव्य आयोजन

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक आणि क्रीडा क्षेत्रात अग्रेसर असलेल्या म्हसळे तालुक्यातील खरसई येथील सोमजाई माता क्रीडा मंडळ ट्रस्टचा सन २००१ मधील ३८ वा क्रीडा महोत्सव दिनांक ११ व १२ डिसेंबर रोजी भव्य कबड्डी व क्रिकेट स्पर्धांचे आयोजन करून संपन्न होणार आहे.सोमजाई माता व्यायामशाळे जवळ क्रीडांगणात आयोजित कबड्डी क्रिडा स्पर्धा शनिवारी दिनांक ११ डिसेंबर रोजी तर क्रिकेटच्या स्पर्धा रविवार दिनांक १२ डिसेंबर रोजी होणार असल्याचे मंडळाचे कार्याध्यक्ष काशिनाथ पयेर यांनी माहिती देताना सांगितले. कबड्डी स्पर्धेत अंतिम चार विजेत्या संघांना १०हजार,७हजार आणि ४ हजारांची दोन बक्षिसे व ट्रॉफी असणार आहे तर क्रिकेट स्पर्धेत अंतिम व उप विजेत्यांना १० हजार व ५५५५ रुपयांचे बक्षीस आणि ट्रॉफी जाहीर करण्यात आली आहे. ज्या संघांना आयोजित स्पर्धेत सहभागी व्हायचे आहे त्यांनी मंडळाचे सदस्य रमेश कातकर ७३१७५५००४४ आणि यशवंत मेंदडकर ७६६६४०५९३ यांचे जवळ संपर्क साधण्याचे जाहीर निमंत्रण संस्थापक अध्यक्ष चंद्रकांत खोत यांनी दिले आहे.

# राष्ट्रीय महामार्ग ५४८अ वरील काम नित्कृष्ठ दर्जाचे

**दै.रायगड नगरी । कर्जत**



दोन जिल्ह्यातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग ५४८अ चे काँक्रीटकरणाचे काम नित्कृष्ठ झाले असल्याने त्या कामाची गुणवत्ता तपासण्याची मागणी मावळ लोकसभा मतदारसंघाचे खासदार श्रीरंग बारणे यांनी केली.आज लोकसभेत खासदार बारणे यांनी तारांकित प्रश्न उपस्थित करीत केंद्रीय रस्तेविकास राज्यमंत्री व्ही के सिंग यांच्याकडे अल्पावधीत खराब झालेल्या रस्त्याची गुणवत्ता कोण तपासणार? असा प्रश्न तारांकित प्रश्न उपस्थित करताना केंद्रिय राज्यमंत्र्यांना केला.

मुंबई-नागपूर समृद्धी महामार्ग वरून येणारी वाहने यांच्यासाठी शहापूर तालुक्यातील वशेणी येथून मुरबाड- कर्जत- खोपोली-वाकण असा राष्ट्रीय महामार्ग तयार होत आहे.रायगड जिल्ह्यात हा राष्ट्रीय महामार्ग ५४८ अ खोपोली जवळील हाळ येथे मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्ग याला जोडतो. हा राज्यमार्ग समृद्धी महामार्गावरून जवाहरलाल नेहरू पतन जेएनपीटीकडे जाणारी वाहतूक नियंत्रित करणारा महामार्ग म्हणून राष्ट्रीय महामार्गात रूपांतरित केला आहे. ग्रीन हायवे म्हणून नियोजित असलेल्या महामार्ग रस्त्याचे बांधकाम महाराष्ट्र सरकारच्या राज्य रस्ते विकास महामंडळाकडून केले जात आहे. ठाणे आणि रायगड जिल्ह्यातुन जात असलेल्या या राष्ट्रीय महामार्ग रस्त्याचे काम जवळपास ७० टक्के पूर्ण होत आले आहे.त्यातील रायगड जिल्हा हद्दीमधील रस्त्याचा भाग १० मीटर रुंद काँक्रीटचा बनवला जात आहे. मात्र या रस्त्यावर नवी दिल्ली येथून नेमलेल्या ठेकेदारांनी रस्त्यावर केलेले काम हे नित्कृष्ठ दर्जाचे झाले असल्याचे या रस्त्यावरून प्रवास करताना दिसून येत आहे. त्यात नित्कृष्ठ दर्जाचे काम केल्याने काँक्रीटच्या रस्त्याला भेगा पडणे, रस्त्यातील काँक्रीट बाहेर येणे, रस्त्याचा भाग खचून सपाट रस्त्यावर खोलगट भाग तयार होणे असे प्रकार घडले असून काँक्रीटचा रस्ता बनला असला तरी या रस्त्याने वेगाने वाहने चालविणे धोक्याचे होऊन गेले आहे. रस्ता एकसंघ बनवला गेला नसल्याने रस्त्यावर ८० किलोमीटर वेगाने वाहने जात असताना समुद्रातील लाटांप्रमाणे वाहने वर खाली होत असतात. याबाबत कर्जत आणि खालापूर तालुक्यातील वाहनचालक यांनी मावळ लोकसभा मतदारसंघाचे खासदार श्रीरंग बारणे यांच्याकडे तक्रारी केल्या होत्या.

पुणे- मुंबई राष्ट्रीय महामार्ग च्या खोपोली हाळ फाटा येथून कर्जत पर्यंत रस्त्याचे चौपदरीकरण या तयार झालेल्या रस्त्याचे काम नित्कृष्ठ दर्जाचे झाले असल्याचा तारांकित प्रश्न आज संसदेच्या अधिवेशनात खासदार श्रीरंग बारणे यांनी उपस्थित केला. खासदार बारणे यांनी या रस्त्याचे केलेले बांधकाम याची गुणवत्ता तपासण्याची मागणी केली.केंद्रीय रस्ते विकास मंत्रालयाचे वतीने राज्यमंत्री व्ही के सिंग यांनी देशातील राष्ट्रीय महामार्ग रस्त्यांची गुणवत्ता उत्तम दर्जाची आहे असे मत देशातील रस्त्यांच्या स्थितीबद्दल बोलताना संसदेत व्यक्त केले होते. केंद्रीय रस्ते विकास राज्यमंत्री यांच्या निवेदनानंतर मावळ लोकसभा मतदारसंघाचे खासदार श्रीरंग बारणे यांनी तारांकित प्रश्न उपस्थित केला होता. खोपोली-कर्जत-मुरबाड-शहापूर या राष्ट्रीय महामार्ग ५४८ अ ची गुणवत्ता तपासण्याची मागणी केली.त्या रस्त्याची गुणवत्ता केंद्रीय रस्ते विकास मंत्रालय करणार की महाराष्ट्र शासनाचे राज्य रस्ते विकास महामंडळ करणार?असा प्रश्न केंद्रीय राज्यमंत्री व्ही के सिंग यांना विचारला. रस्त्यात अनेक ठिकाणी अर्धवट कामे असतांना आणि वाहनचालक यांना रस्त्यावरून वेगाने प्रवास करता येत नाही. असे असताना देखील वाहनचालक यांच्याकडून टोल वसूल करण्यासाठी टोल नाके उभारण्याचे काम सुरू आहे हे पूर्णपणे चुकीचे आहे असा आरोप बारणे यांनी यावेळी संसदेत बोलताना केला. खासदार बारणे यांच्या या प्रश्नाने कदाचित खोपोली-कर्जत-मुरबाड-शहापूर राष्ट्रीय महामार्गाचे काम तपासले जाईल असा आशावाद स्थानिक वाहनचालक व्यक्त करीत आहेत.

## रायगड जिल्ह्यातील सहा नगरपंचायत निवडणुकीत नेत्यांची प्रतिष्ठा पणाला

**दै.रायगड नगरी । तळा**

नगरपंचायतीच्या निवडणुकांसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची काल शेवटची तारीख होती. स्थानिक पातळीवरच्या निवडणुका असल्यामुळे इथे कुणी स्वबळावर तर कुणी एकत्रित लढण्याचा निर्णय घेतला आहे. परंतु स्वबळ की आघाडी याचा अंतिम फैसला उमेदवारी अर्ज माघार घेण्याच्या दिवशीच स्पष्ट होईल.

रायगड जिल्ह्यातील सहा नगरपंचायतीच्या निवडणुकीसाठी प्रक्रिया सुरू झाली आहे. या निमित्ताने राज्याच्या उद्योग आणि खनिकर्म पर्यटन फलोत्पादन, क्रीडा व युवक कल्याण, राजशिष्टाचार, माहीती व जनसंपर्क विधि व न्याय तथा पालकमंत्री रायगड ना.अदिती तटकरे यांच्यासह शिवसेना-भाजप, राष्ट्रवादी, शेकाप, वंचित अशा सगळ्याच पक्षाच्या नेत्यांच्या प्रतिष्ठा पणाला लागल्या आहेत. उमेदवारी अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी प्रमुख पक्षांच्या उमेदवारांनी शक्ती प्रदर्शन करत अर्ज दाखल केले.

तळा नगरपंचायतींसाठी ३९ , माणगाव ४८ म्हसळा ४० पोलादपूर ५८ पाली ४८ खालापूर ५२ जणांनी उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. कांग्रेस, भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, शेकाप, वंचित या पक्षांनी स्वतंत्र उमेदवार निवडणूक रिंगणात उतरवले आहेत. सहा नगर पंचायतीत प्रत्येकी १७ जागांसाठी निवडणूक होत असून, १३ डिसेंबरपर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेता येणार आहेत.

२१ डिसेंबर रोजी मतदान तर २२ तारखेला मतमोजणी होणार आहे. तळा, माणगाव, म्हसळा नगरपंचायतीत पालकमंत्री ना.अदिती तटकरे शिवसेना रायगड जिल्हा प्रमुख अनिल नवगणे, ॲड.राजीव साबळे, खालापूर मध्ये शिवसेना आ.महेंद्र थोरवे, शेकाप आ.जयंत पाटील माजी आ.सुरेश लाड,पाली मध्ये भाजप आमदार रविशेठ पाटील, माजी आ.धैर्यशील पाटील, पोलादपूरमध्ये आ. भरतशेठ गोगावले काँग्रेसचे हनुमंत जगताप या नेत्यांची प्रतिष्ठा पणाला लागली आहे. नगरपंचायत आपल्या ताब्यात यावी यासाठी सगळ्यांनी जोर लावला आहे.

## खारभूमी लगत असणारे सुरक्षित बंधारे फुटून शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

म्हसळा तालुक्यातील आंबेत खाडीपट्टा सावित्री किनारपट्टीवर असणाऱ्या खारगाव लिपनिवावे हद्दीत शेतकऱ्यांच्या शेतात खार पाणी शिरल्याने खूप मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याची घटना घडली. या शेती नजदीक बांधण्यात आलेल्या खारभूमीलगतच्या शेतबंधाऱ्याचा काहीसा भाग फुटल्याने हा प्रकार घडल्याची माहिती येथील ग्रामस्थांनी दिली प्रशासनाचे या बंधाऱ्यांकडे झालेले दुर्लक्ष यास कारणीभूत असून येथील भातशेतीसह नुकत्याच लावण्यात आलेल्या कडधान्य पिकांची देखील या पाण्यात अक्षरशः नासाडी झाली आहे, महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री स्वर्गवासी बॅ अंतुले यांनी त्यांच्या मुख्यमंत्री काळात या खारभूमी लागत असणाऱ्या शेतीच्या सुरक्षिततेकरिता हे बंधारे बांधले होते मात्र कालांतराने प्रशासनाने याकडे दुर्लक्ष केल्याने या बंधाऱ्यांचा बराचसा भाग धासळल्याने शेतकऱ्यांच्या शेतात सावित्री नदीचे खारे पाणी शिरत असून अशा संकटांना आता येथील शेतकऱ्यांना सामोरे जावे लागत आहे प्रशासनाने लवकरात लवकर या गोष्टीची दखल घेऊन याची झालेली नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी येथील ग्रामस्थ करत आहेत.

## जिल्हास्तरीय बॅडमिंटन स्पर्धेचे आयोजन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या उलवे नोड येथील रामशेठ ठाकूर इंटरनॅशलन स्पोर्टस कॉम्प्लेक्सच्यावतीने खेळाडूंसाठी अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करून त्यांच्या कलागुणांमध्ये आणखी भर पाडावी यासाठी अनेक स्पर्धांचे आयोजन करण्यात येत असते. त्यानुसार रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स व रायगड जिल्हा बॅडमिंटन असोसिएशनच्या वतीने १० ते १३ डिसेंबर दरम्यान जिल्हास्तरीय बॅडमिंटन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आले आहे.




या स्पर्धेचे स्पर्धेचे स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सचे चेअरमन आणि पनवेल महापालिकेचे सभागृहनेते परेश ठाकूर यांच्या हस्ते शुक्रवारी उदघाटन झाले. यावेळी रायगड बॅडमिंटन संस्थेचे सचिव डेव्हिड अल्वारीस, स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सचे सहाय्यक व्यवस्थापक श्यामनाथ पुंडे, व्यवस्थपन समिती सदस्य रवींद्र भगत, शिवा कराली, योगेश पाटील यांच्यासह खेळाडू उपस्थित होते.

## सीकेटी मधील गुणवंत विद्यार्थ्यांचा शनिवारी सत्कार सोहळा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

दर्जेदार शिक्षणासोबत कला, क्रीडा, सामजिक क्षेत्रातही उत्कृष्ठ कामगिरी करणाऱ्या नामवंत अशा जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे प्रेरणास्त्रोत स्वर्गीय चांगू काना ठाकूर यांच्या स्मरणार्थ शनिवार दिनांक ११ डिसेंबर रोजी दुपारी ३. ३० वाजता सीकेटी महाविद्यायातील (स्वायत्त) गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला आहे.

खांदा कॉलनी येथील सीकेटी महाविद्यायात हा सोहळा जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून डीएव्ही मुंबई महाविद्यालयाचे प्राचार्य व मुंबई विद्यापीठाच्या कॉमर्स अँड मॅनेजमेंटचे अधिष्ठाता डॉ. अजय भामरे, मुंबई विद्यापीठाचे रजिस्टार सुधीर पुराणिक, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, तर प्रमुख मान्यवर म्हणून जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, कार्याध्यक्ष वाय. टी. देशमुख, महापौर डॉ. कविता चौतमोल, संस्थेच्या कार्यकारिणी मंडळाचे सदस्य व पनवेल महानगरपालिकेचे सभागृहनेते परेश ठाकूर, नगरसेवक अनिल भगत, मनोहर म्हात्रे, संतोष शेट्टी, हेमलता म्हात्रे, एकनाथ गायकवाड, सीता पाटील, संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे, कार्यकारी मंडळ सदस्य संजय भगत व इतर मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

---

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमूद असलेल्या मालकांकडून कायमची खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहाण, दान, लिज, बक्षिसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यारपत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्या आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधित व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरुपात खालील नमूद पत्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमीन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पूर्ण करतील. मुदतबाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मौजे : खांडपे, ता.कर्जत, जि.रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नांव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| १) श्री.शशिकांत गणपत भोईर<br>२) श्री.रघुनाथ गणपत निगुडसे | ४८ | १ | ००-८२-०० | ११.५६ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता : मु.उक्रुळ, पो.चिंचवली, ता.कर्जत, जि.रायगड ४१०२०१

**सही/-**
**ॲड.जयेश संभाजी म्हसे**
**दि.११/१२/२०२१**
**मो.नं.९०२८९८२२७७**

---

मा.सोनावणे सो. यांचे कोर्टात
अर्जदाराचे वकील : नरेश म्हस्कर

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.२३१/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.२१/०१/२०२२

१) श्री.रघुनाथ अंबाजी पाटील
२) श्री.कमळाकर अंबाजी पाटील
३) कुमारी मंगलाबाई उर्फ मंगळीबाई अंबाजी पाटील
४) कुमारी चांगुणा अंबाजी पाटील — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, अर्जदार नं.१ ते ४ यांची आई कै.जोमीबाई अंब्या उर्फ अंबाजी पाटील ही दि.२०/०६/२०१८ रोजी मौजे : कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झाली आहे. अर्जदार नं.१ ते ४ यांचे भाऊ कै.रवींद्र (रविंद्रनाथ) अंब्या उर्फ अंबाजी पाटील हे दि.१५/०५/१९८४ रोजी मौजे : कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड येथे अविवाहित मयत झाले आहेत. सबब कै.रवींद्र (रविंद्रनाथ) अंब्या उर्फ अंबाजी पाटील मृत्यूच्या वेळी अविवाहित मयत झालेले आहेत. सबब कै.जोमीबाई अंब्या उर्फ अंबाजी पाटील यांच्या मालकीच्या मौजे : कोपर, ता.पनवेल, जि.रायगड येथील खालील वर्णनाच्या शेतजमिनीच्या मिळकती सिडकोतर्फे संपादीत झालेल्या आहेत.

| गावाचे नाव व युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|---|
| कोपर १७३ | ९० | ६ | ०-४०-८ | ३.३६ |
| | | | ०-०५-० | |
| | | एकूण | ०-४१-३ | |

सबब तरी वरील मिळकतीबाबत कै.जोमीबाई अंब्या उर्फ अंबाजी पाटील यांचे कायदेशीर वारस असल्याचा वारस दाखला मिळण्यासाठी अर्जदार यांनी नामदार कोर्टात अर्ज दाखल केला आहे. तरी सदर वारस दाखल्याच्या कामी कोणाच्याही, कसल्याही हरकती असल्यास सदरच्या हरकती ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याचे आत मेहेरबान कोर्टात दाखल कराव्यात. मुदतीनंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही व अर्जदार यांचे लाभांत वारस दाखला दिला जाईल याची नोंद घ्यावी.

आज तारीख ०८/१२/२०२१ रोजी माझ्या सहीने व कोर्टाचे शिक्क्याने नोटीस दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — (कोर्टाचा शिक्का) — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

मा.गोडसे सो
प्रो.जमा ६-२५
अर्जदाराचे वकील
ॲड.तुषार एल. सोंडकर

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर सो यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.१७२८/२०२१
नि.नं.७/ड
ने.ता.१७/०२/२०२२

१) श्रीमती.लिला सदानंद म्हात्रे (पत्नी)
वय : ६२ वर्षे, धंदा : गृहिणी
२) श्री.विजय सदानंद म्हात्रे (मुलगा)
वय : ३८ वर्षे, धंदा : रिक्षा चालक
३) श्री.अरविंद सदानंद म्हात्रे (मुलगा)
वय : ३५ वर्षे, धंदा : रिक्षा चालक
रा.मु.विचुंबे, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

ज्याअर्थी कै.सदानंद धोंडू म्हात्रे हे दि.२२/०४/२०२१ रोजी एम.जी.एम. हॉस्पिटल कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड येथे मृत्यू पावले आहेत. तसेच त्यांची आई ताईबाई धोंडू म्हात्रे या अंदाजे सन १९८० रोजी मु.विचुंबे, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झाल्या आहेत. त्यांचे नावे खालील वर्णनाची मिळकत आहे.

**१) बँक ऑफ महाराष्ट्र खाते क्र.२०१२१७०२७७५ पनवेल शाखा, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड**

**रक्कम रु.३७,७४,७३२/- (अक्षरी रक्कम रु.सदतीस लाख चौऱ्याहत्तर हजार सातशे बत्तीस रुपये)**

**२) बँक ऑफ महाराष्ट्र शाखा पनवेलची मुदत बंद ठेवी क्रमांक ६०३७९३१३८३४**

**रक्कम रु.२५,००,०००/- (अक्षरी रक्कम रु.पंचवीस लाख रुपये)**

कै.सदानंद धोंडू म्हात्रे यांचे मृत्यूपश्चात त्यांस अर्जदार हे वारस आहेत. सदर वारसांव्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सबब, अर्जदार यांनी सदरचा वारस दाखला मिळण्यासाठी अर्ज करीत आहे. सदर वारसांव्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सबब, सदरचा वारस दाखला अर्जदार यांस देण्यासंबंधी कोणाही इसमाच्या कोणत्याही हरकती असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास कोणत्याही हरकती नाहीत असे समजून अर्जदार यांस वारस दाखला देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज तारीख ९/१२/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — (कोर्टाचा शिक्का) — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

मा.मुजावर सो.
ॲड.अरविंद चामले
ॲड.शुभांगी पाटील

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर सो.पनवेल यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.१७६२/२०२१
नि.नं.८/ड

श्रीमती.लता अशोक जगताप
पुर्वाश्रमीची लताबाई नरहरी देशमुख
वय : ५४ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.सासवड, ता.पुरंदर, जि.पुणे,
व रा.गव्हाण, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

सदर जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, प्रस्तुत अर्जदार यांनी मे.कोर्टात चौकशी अर्ज दाखल केला आहे. प्रस्तुत अर्जदार यांचे वडील कै.नरहरी नामाजी देशमुख हे दि.१२/०१/१९६६ रोजी व अर्जदार यांची आई कै.लक्ष्मीबाई नरहरी देशमुख ही दि.२०/०९/२०१५ रोजी मु.गव्हाण, ता.पनवेल, जि.रायगड येथे मृत्यू पावले असून ते तेथील कायमचे रहिवासी होते. असून मृत्यूसमयी अर्जदार यांची आई कै.लक्ष्मीबाई नरहरी देशमुख यांचे नावावर खालीलप्रमाणे मिळकती होती व तिचे वर्णन पुढील प्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : गव्हाण, ता.पनवेल, जि.रायगड**

| अ.क्र. | सर्व्हे नं./हिस्सा नं. | क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|
| १ | २७४/२ | ०-७५-०० | १.८७ |
| २ | २७४/१०/ब | ०-८७-०० | १.३२ |

मयत कै.नरहरी नामाजी देशमुख व कै.लक्ष्मीबाई नरहरी देशमुख यांचे कायदेशीर वारसदार पुढीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | वारसदाराचे नांव | वय | मयताशी नाते |
|---|---|---|---|
| १ | श्रीमती.लता अशोक जगताप | ५४ | विवाहित मुलगी |

वरीलप्रमाणे मयत कै.नरहरी नामाजी देशमुख व कै.लक्ष्मीबाई नरहरी देशमुख यांचे कायदेशीर वारसदार आहेत व यांचे शिवाय इतर कोणीही वारसदार नाहीत व नव्हते. प्रस्तुतचा चौकशी अर्ज हेअरशिप ठरवून मिळण्यासाठी मे.कोर्टात दाखल केला आहे. तरी या संदर्भात वारसा संबंधी कोणत्याही प्रकारची तक्रार हरकत वगैरे असल्यास त्याने तशी लेखी हरकत हा जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात हजर होवून दाखल करावी. वरील मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदरहू कोर्ट वरील अर्जदार यांचे हक्काबाबत लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्याला सदरहू मयताचे मिळकतीचे वारस म्हणून दाखला देईल व त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

दि.१०/१२/२०२१
ठिकाण : पनवेल

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.क.स्तर, पनवेल** — (कोर्टाचा शिक्का) — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.क.स्तर, पनवेल**

---

मा.मुजावर सो.कोर्ट
ॲड.अनिल रा. नागदेवे
ॲड.संजय के. कानडे

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.१२/२०२१
नि.नं.१५/ड
ने.ता.१७/१२/२०२१

१) श्रीमती.सरिता राजेंद्र सुर्वे
वय : ५० वर्षे, धंदा : गृहिणी
रा.देवनार, म्युनिसपल कॉलनी, बिल्डींग नं.१६, रुम नं.६, गोवंडी, मुंबई, महाराष्ट्र
२) श्री.आदित्य राजेंद्र सुर्वे
वय : २८ वर्षे, धंदा :
रा.देवनार, म्युनिसपल कॉलनी, बिल्डींग नं.१६, रुम नं.६, गोवंडी, मुंबई, महाराष्ट्र
३) सौ.स्नेहा राजेंद्र सुर्वे उर्फ स्नेहा रोहित जोगळे
वय : ३२ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.देवनार, म्युनिसपल कॉलनी, बिल्डींग नं.१६, रुम नं.६, गोवंडी, मुंबई, महाराष्ट्र
४) सौ.नम्रता राजेंद्र सुर्वे उर्फ नम्रता सुशांत शिंदे
वय : ३० वर्षे, धंदा : गृहिणी
रुम नं.१, बिल्डींग नं.२६, रा.देवनार, म्युनिसपल कॉलनी, गोवंडी, मुंबई, महाराष्ट्र — अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, कै. राजेंद्र बळीराम सुर्वे ह्यांचे दि.०८/०७/२०२० रोजी गोवंडी, मुंबई येथे निधन झालेले आहे. सबब, कै.राजेंद्र बाळाराम सुर्वे यांना अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत. कै.राजेंद्र बाळाराम सुर्वे व अर्जदार यांच्या नावे खालील वर्णनाची स्थावर मिळकत आहे.

सबब खालील मिळकतीसाठी वारस दाखला मिळावा म्हणून अर्जदार यांनी मे.कोर्टात अर्ज केलेला आहे.

| मिळकत | क्षेत्र | किंमत |
|---|---|---|
| **फ्लॅट नं.६/१०२, पहिला मजला, लोटस बिल्डींग, सर्वे नं.१२३/१३ आणि १२३/१२/३ (अ) कोळखे गाव, ता.पनवेल, जि.रायगड** | **३६२ चौ.फूट कारपेट + ३५ चौ. फूट. टेरेस** | **४,१८,८००/-** |

तरी अर्जदार यांच्या वारसा हक्काबद्दल कोणत्याही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत, जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत, तर हे मे.कोर्ट अर्जदार यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि जर अर्जदार हे कै.राजेंद्र बाळाराम सुर्वे यांचे वारसदार आहेत असे सिद्ध झाल्यास अर्जदारांना वारसदाखला मंजूर करण्यात येईल.

आज दि.१०/१२/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — (कोर्टाचा शिक्का) — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**